2019 - 20

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - I January - March - 2020

ENGLISH PART - III / MARATHI PART - II / HINDI

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | कृषी क्षेत्राच्या विकासात महिलांचे योगदान : एक आढावा<br>**प्रा. डॉ. एकनाथ सावळे**<br>**प्रा. डॉ. माणिक चव्हाण** | १-६ |
| २ | नोकरदारस्त्रीया आणि त्यांच्या समस्या<br>**डॉ. कल्पना हनुमंतराव घारगे** | ७-१० |
| ३ | महिला शिक्षणाच्या प्रणेत्या : सावित्रीबाई फुले<br>**प्रा. ज्योती शा. मगर** | ११-१६ |
| ४ | महिला सबलीकरण<br>**प्रा. डॉ. डी. बी. काळे** | १७-२१ |
| ५ | बालकांच्या विकासात मातेची भूमिका<br>**मधुरा सुधीर त्रिनेत्रे** | २२-२५ |
| ६ | महिलांचे आरोग्य आणि वाढता ताण-तणाव<br>**डॉ. गाया खांदाट**<br>**नेत्रा काचरू शेळके** | २६-३१ |
| ७ | पंचायतराज - महिला आरक्षण आणि राजकीय सक्षमीकरणासाठी आवश्यक घटक - एक अभ्यास<br>**डॉ. जीवनज्योति निकाळजे (म्हस्के)**<br>**डॉ. सुनिता पटवर्धन (जोगळेकर)** | ३२-३५ |
| ८ | आदिवासी समाजातील स्त्रीयांचा दर्जा<br>**प्रा. प्रतिभा विष्णू आघार्डे** | ३६-३९ |
| ९ | महिलांसाठी उद्योजकीय संधी : एक अभ्यास<br>**डॉ. प्रमिला भगत** | ४०-४४ |
| १० | औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी मधुमेही महिलांमधील मधुमेहाचा प्रादुर्भाव<br>**डॉ. माया खांदाट**<br>**प्रियंका भिंगारे** | ४५-५० |

# १. कृषी क्षेत्राच्या विकासात महिलांचे योगदान : एक आढावा

**प्रा. डॉ. एकनाथ सावळे**
अर्थशास्त्र विभाग, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर, ता. जि. बीड.
**प्रा. डॉ. माणिक चव्हाण**
अर्थशास्त्र विभाग, कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता. जि. बीड.

**प्रास्ताविक**

२१ व्या शतकातही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून कृषीकडे पाहिले जाते. कृषी हा ग्रामीण भागाशी निगडीत असलेला प्रमुख व्यवसाय आहे. भारतात जवळपास साहे सहा लाख खेड्यांची संख्या आहे. २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या ६८.८ टक्के लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते. या लोकसंख्येचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे उपजीविकेचे साधन हे कृषी आहे. भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पादन (GDP) मधील कृषी क्षेत्राचा वाटा कमी होत असला तरी ग्रामीण भागात उपजीविकेचे साधन म्हणून कृषीचे महत्त्व आजही कमी झालेले नाही. कृषी क्षेत्रामधून उद्योग व सेवा क्षेत्राच्या भरभराटीला पोषक वातावरण निर्माण करुन दिले जाते. तसेच वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्याची गरज याच क्षेत्रातून पूर्ण होते.

अशा अनेक कारणांमुळे आर्थिक विकासात कृषीची भूमिका महत्त्वाची असली तरी कृषी करणाऱ्या शेतकऱ्यांची स्थिती मात्र अत्यंत वाईट आहे. आर्थिकदृष्ट्या शेती परवडत नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येचे प्रमाण सतत वाढत असल्याचे दिसून येत आहे. आज भारतासमोर शेतकरी आत्महत्या आणि कृषीची समस्या हे सर्वात मोठे आव्हान आहे. या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी भारतीय कृषी ही पूर्णपणे महिलांच्या हाती देणे आवश्यक आहे. डॉ. स्वामीनाथन यांच्या मते कृषीचा शोध मूळातच स्त्रीने लावलेला आहे. त्यांच्या मते मानवाच्या सुरुवातीच्या काळात पुरुष अन्नाच्या शोधात शिकार करायला गेले असतांना वस्तीतील महिला या मूळ वनस्पतींपासून बियाणे गोळा करु लागल्या. अन्न, चारा, इंधन यांच्या दृष्टीकोनातून त्या शेतीत लागवड करु लागल्या. त्यातून शेती करण्यास सुरुवात झाली. जमीन, पाणी, वनस्पती, प्राणी यासारख्या जीवनातील मुलभूत प्रणालीच्या संवर्धनात महिलांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे आणि ती अजूनही कायम आहे. आज याच महिलांनी कृषी क्षेत्रातील विविधता आणली. अनुवंशिक प्रतिरोधनाच्या देखभालीद्वारे पीक सुरक्षेस, अन्नसुरक्षेस व शाश्वत कृषी विकासास चालना दिली आहे.

आज आंतरराष्ट्रीय विकास समुदायाने हे मान्य केले आहे की, शेती ही गरीबाचा मुख्य व्यवसाय असलेल्या देशामध्ये विकास, वृद्धी आणि गरीबी कमी करण्याचे इंजिन आहे आणि अशी अर्थव्यवस्था घडविण्यात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मागील काही वर्षांपासून कृषी विकासात महिलांच्या भूमिकेची जाणीव जगाला होत आहे.

**विषय निवडी मागील भूमिका**

आज कृषी आणि अन्नप्रणालीसमोर मानवाला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. कायमस्वरुपी आणि उद्योन्मुख आर्थिक विकास, पर्यावरणीय आणि सामाजिक चिंताच्या संदर्भात वाढणारी जागतिक लोकसंख्या, किंमतीतील

अस्थिरता, बाजारामधील असूरक्षितता, संघर्ष, प्रदीर्घ संकटे, सामूहिक स्थलांतर, वेगाने होणारे शहरीकरण, आहार पद्धती आणि जीवन निर्वाह प्रणालीतील बदल, नैसर्गिक संसाधनातील घट आणि हवामानातील बदल या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी कृषी क्षेत्राने संपूर्ण क्षमतेने कार्य करणे अधिक महत्त्वाचे आहे. हे सर्व साध्य करण्यासाठी शेतीच्या क्षमतेवर परिणाम घडवून आणणारी असमानता दूर करणे आवश्यक आहे. या सर्व कार्यात महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. कारण आज भारतीय शेतीचे स्त्रीलिंगीकरण झाले आहे. आर्थिक सर्वेक्षण २०१८ मध्ये असे नमूद केले आहे की, पुरुषाद्वारे ग्रामीण शहरी स्थलांतर केल्याने कृषी क्षेत्राचे स्त्रीलिंगीकरण होते. ज्यात शेतकरी, उद्योजक आणि कामगार म्हणून अनेक भूमिका असलेल्या महिलांची या क्षेत्रातील संख्या वाढत आहे. जागतिक स्तरावर खाद्य सुरक्षा आणि स्थानिक कृषी जैवविविधता टिकवून ठेवण्यात महिलांची भूमिका निर्णायक ठरत आहे. त्यामुळे कृषी क्षेत्राच्या विकासात महिलांची काय भूमिका आहे याचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

**उद्दिष्ट्ये**

१. कृषी क्षेत्रातील महिलांचे प्रमाण व महिलांच्या बहुआयामी भूमिकेचा अभ्यास करणे.
२. कृषी व बिगर कृषी क्षेत्रातील महिलांच्या प्रमाणाचा अभ्यास करणे.
३. महिलांना देण्यात येणाऱ्या मजूरीचा अभ्यास करणे.
४. कृषीच्या शाश्वत विकास व नैसर्गिक विविधता संवर्धनात महिलांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीयक साधन सामग्रीचा आधार घेण्यात आला असून यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, दैनिके, शासकीय अहवाल, संकेतस्थळे इत्यादींचा प्रामुख्याने उपयोग केलेला आहे.

**गृहितके**

१. भारतीय कृषीचे स्त्रीलिंगीकरण झाले आहे.
२. कृषी क्षेत्राच्या विकासात महिला बहुआयामी भूमिका बजावतात.
३. कृषी विकास व जैवविविधता टिकविण्यात महिलांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत आहे.
४. कृषी क्षेत्रात पुरुषापेक्षा महिला कामगारांना कमी मजूरी दिली जाते.

**महिलांचे कृषी क्षेत्रातील प्रमाण**

२०११ च्या जनगणनेनुसार देशातील एकूण महिला कामगारांपैकी ६७ टक्के महिला कामगार कृषी क्षेत्रात आहेत. ग्रामीण भागात ८४ टक्के महिलांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन शेती आहे. आज ३३ टक्के महिला शेतकरी तर ४७ टक्के महिला शेतमजूर आहेत. देशातील काही भागात विशेषतः डोंगराळ राज्ये, ईशान्यकडील राज्ये आणि केरळसारख्या राज्यात कृषी क्षेत्रात महिलांचे योगदान पुरुषापेक्षा जास्त आहे. शेतीशी निगडीत ४८ टक्के रोजगारात महिलांचा सहभाग आहे. आज सुमारे ७.५ कोटी महिला दुग्ध उत्पादन आणि पशूधन व्यवस्थापनात महत्त्वाची भूमिका बजावतात. तसेच चहा लागवडीत ४७ टक्के कापूस लागवडीत ४६.८४ टक्के, तेलबियांच्या उत्पादनात ४५.४३ टक्के आणि भाजीपाला उत्पादनात ३९.१३ टक्के महिलांचे प्रमाण आहे.

**महिलांची बहुआयामी भूमिका**

कृषी क्षेत्रामध्ये महिला कामगारांची भूमिका ही कामगार किंवा शेतमजूर एवढ्यापुरती मर्यादित नसून ती बहुआयामी आहे. महिला कामगार या शेतात खुरपणी, गवत कापणे, कापसाच्या गाठी गोळा करणे, बीया वेगळ्या करणे, पशूधन ठेवणे, कुक्कुपालन, वराहपालन, शेळी-मेंढी पालन, दुग्ध उत्पादन, दुध प्रकिया अशी विविध प्रकारची कामे करतात. त्यांच्या कामाच्या या बहुआयामी स्वरुपाची ओळख करुन देताना असे म्हणता येईल की हवामान बदलाच्या उलट परिस्थितीत आणि नैसर्गिक स्त्रोतांचे व्यवस्थापन करण्यासाठी महिलांचे योगदान कधीच नाकारता येत नाही. त्यांच्या या बहुआयामी कामाची विभागणी पुढील तीन भागात करता येते.

**१. कृषी उपक्रम**

यात पेरणी, लावणी, खुरपणी, सिंचन, खताचा वापर, कापणी, साठवणूक आणि वनस्पतीचे संवर्धन व संरक्षण करणे इत्यादी.

**२. घरगुती कामे**

घरगुती कामामध्ये पाककला, मुलाचे संगोपन, पाणी संकलन, इंधन, लाकूड गोळा करणे, घराची देखभाल, घरगुती कामे इत्यादी.

**३. इतर कामे**

यामध्ये पशूपालन, कुक्कुटपालन, वराहपालन, शेळी-मेंढीपालन, चारा संग्रहण, दुध व दुग्ध प्रक्रिया उद्योग आदींचा समावेश होतो.

**कृषी व बिगर कृषी क्षेत्रातील महिलांचे प्रमाण**

भारताच्या एकूण GDP मध्ये महिलांचे योगदान ३७ टक्के आहे. ग्रामीण व शहरी भागात महिला या विविध व्यवसायात योगदान देत आहेत. त्यामुळे आज महिलांनी अर्थव्यवस्थेतील प्रत्येक क्षेत्रात पाऊल टाकले आहे. आज प्रत्येक क्षेत्रात महिलांची संख्या वाखण्याजोगी आहे. आज कोणतेही क्षेत्र चुकूनही सापडत नाही की जेथे महिलांचा सहभाग नाही. एकंदरीत देशाच्या सर्वांगिण आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक सांस्कृतिक विकासात महिलांची प्रमुख भूमिका ठरत आहे. ढोबळ मानाने कृषी व बिगर कृषी क्षेत्रात महिला कामगारांचे वर्गीकरण केले जाते. भारतातील १८ प्रमुख राज्यांमध्ये कृषी व बिगर कृषी क्षेत्रामध्ये कशी विभागणी झाली आहे हे पुढील तक्त्यामध्ये दर्शविले आहे.

**महिला कामगाराचे कृषी व बिगर कृषी क्षेत्रातील प्रमाण**

| अ.क्र. | राज्य | एकूण महिला कामगार | कृषी क्षेत्रातील महिला कामगार (%) | बिगर कृषी क्षेत्रातील महिला कामगार (%) |
|---|---|---|---|---|
| १ | हिमाचल प्रदेश | ६३०५२१ | ८२.४७ | १७.५३ |
| २ | मणिपूर | २२९१३७ | ५५.५९ | ४४.४१ |
| ३ | नागालँड | २७९१६६ | ८२.६६ | १७.३४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | आंध्रप्रदेश | ९५८५३८१ | ७३.४४ | २६.५६ |
| ५ | राजस्थान | ४५९५५७० | ८१.०७ | १८.९३ |
| ६ | मध्यप्रदेश | ५०४६२९३ | ७९.४५ | २०.५५ |
| ७ | कर्नाटक | ५४६७९१४ | ६१.११ | ३८.८९ |
| ८ | तामिळनाडू | ७४५४४७३ | ५९.३० | ४०.७० |
| ९ | महाराष्ट्र | १०३३१७५८ | ७४.५३ | २५.४७ |
| १० | गुजरात | ३५४४५०८ | ५७.१२ | ४२.८८ |
| ११ | ओरिसा | १५८४५२९ | ६०.४७ | ३९.५३ |
| १२ | त्रिपूरा | १७०२३८ | ५२.७८ | ४७.२२ |
| १३ | आसाम | १२६५०६५ | ४२.४७ | ५७.५३ |
| १४ | पंजाब | १४०९७०४ | २४.५१ | ७५.४९ |
| १५ | बिहार | ३५४१८५७ | ८३.५६ | १६.४४ |
| १६ | पश्चिम बंगाल | ३५२८६१२ | ३२.६२ | ६७.३८ |
| १७ | उत्तरप्रदेश | ४९९१३८९ | ६५.८७ | ३४.१३ |
| १८ | केरळ | १७७६२८० | २१.२७ | ७८.७३ |

**स्त्रोत - अर्थ व सांख्यिकी संचलनालय**

वरील तक्त्यामध्ये भारतातील १८ प्रमुख राज्यातील महिला कामगारांची संख्या व त्यांचे कृषी व बिगर कृषी क्षेत्रातील प्रमाण दर्शविले आहे. यावरुन असे दिसून येते की, महिला कामगारांचे कृषी क्षेत्रातील प्रमाण सर्वात जास्त बिहार राज्यात ८३.५६ टक्के असून सर्वात कमी प्रमाण २१.२७ टक्के केरळ राज्यात आहे. जेथे महिलांच्या शिक्षणाला व त्यांच्या अंगभूत गुणांना वाव देणाऱ्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जातात त्या ठिकाणी कृषी क्षेत्रातील महिलांचे प्रमाण कमी होतांना दिसून येते. परंतू अजून ही कृषी क्षेत्रात महिला कामगारांचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून येते.

**महिला कामगाराची मजुरी दर**

भारतीय कृषी क्षेत्रात महिलांचे कार्य पुरषांच्या कार्यापेक्षा किती तरी पट जास्त आहे. महिला या घरातील आणि शेतातील असे दोन्ही ठिकाणी काम करते. ती दिवसातून जवळ-जंवळ १६ ते १७ तास काम करते. त्या तुलनेने पुरुष कामगार १० ते १२ तास काम करतात. महिलांच्या बऱ्याच कामाची कोणीच व कुठेही दखल घेतली जात नाही. महिलांच्या कामाचे तास आणि त्यांना देण्यात येणाऱ्या मजुरीत खुप फरक आहे. आज समान कामासाठी समान वेतनाचा कायदा अस्तित्त्वात असला तरी ग्रामीण भागात पुरुषाच्या व महिलांच्या मजुरीत खुप तफावत आहे. एका सर्व्हेक्षणानुसार भारतात महिला कामगारांना पुरुषांच्या तुलनेत २२ टक्के कमी मजुरी दिली जाते. पण काही ठिकाणी पुरुषांच्या तुलनेत ५० टक्के कमी मजुरी देत असलेले आढळून आले आहे. भारतीय वार्षिक सरासरी दैनिक वेतनात पुरुष व महिलांना देण्यात येणारी मजुरीचे आकडेवारी दिलेली आहे ती पुढीलप्रमाणे-

भारतीय वार्षिक सरासरी दैनिक वेतनाचा दर (रुपयामध्ये)

| अ.क्र. | वर्ष | पुरुषाची मजुरी (रु.) | महिलाची मजुरी (रु.) |
|---|---|---|---|
| १ | २००६-०७ | ८२ | ६२ |
| २ | २००७-०८ | ९१ | ७० |
| ३ | २००८-०९ | १०८ | ८२ |
| ४ | २०१०-११ | १२४ | ९५ |
| ५ | २०११-१२ | १४९ | ११५ |
| ६ | २०१२-१३ | १८३ | १३४ |
| ७ | २०१३-१४ | २१४ | १५८ |
| ८ | २०१४-१५ | २२९ | १७८ |
| ९ | २०१५-१६ | २६८ | २०० |
| १० | २०१६-१७ | २८१ | २१८ |

**स्त्रोत - अर्थ व सांख्यिकी संचलनालय**

वरील तक्त्यात पुरुष व महिला कामगारांना देण्यात येणारी मजुरी दिली आहे. यावरुन असे लक्षात येते की, एकाच कामासाठी पुरुष व महिला कामगारांना वेगवेगळी मजुरी दिली जाते. एवढेच नव्हे तर बिगर हंगामाच्या काळात या मजुरीच्या दरापेक्षाही कमी मजुरी महिलांना देण्यात येते. काम नसल्यामुळे नाईलाजास्तव त्यांना ते काम करणे भाग पडते. या सर्व कारणांमुळे आजही ग्रामीण भागात महिलांची आर्थिक स्थिती खुप नाजुक आहे. त्या परावलंबी आहेत. त्यामुळे त्यांच्या अत्याचारात वाढ होत आहे. एकंदर आर्थिक स्वावलंबन नसणे हे अनेक समस्यांना आमंत्रण देणे आहे. त्यामुळे त्यांच्या मजुरीच्या दराकडे विशेष गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.

**कृषीच्या शाश्वत विकास व नैसर्गिक संवर्धनात महिलाची भूमिका**

जगापुढील अनेक समस्यापैकी अत्यंत ज्वलंत आणि दूरगामी परिणाम करणारी कोणती समस्या असेल तर ती आहे कृषीचा शाश्वत विकास व नैसर्गिक साधनसंपत्तीचे म्हणजेच निसर्गाचे संवर्धन करणे. या समस्याची सोडवणूक करण्यासाठी गाव पातळी पासून ते आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत विविध प्रकारचे प्रयत्न केले जात आहे. मात्र या दोन्ही समस्याची सोडवणूक करण्याच्या कामात महिलांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत आहे. कारण या दोन्ही समस्याची सोडवणूक करण्याचे प्रभावी हत्यार हे ग्रामीण भागातील महिलाजवळ आहे. बऱ्याच शतकापासून ग्रामीण भागातील महिला कळत-नकळतपणे या समस्याची तीव्रता कमी करण्यासाठी कार्य करीत आहेत. मात्र त्यांच्या या कार्याकडे कुणाचेही लक्ष गेले नव्हते. ते आता गेले आहे. आज ग्रामीण भागातील महिला या कृषी क्षेत्रात जवळ-जवळ सर्वच कामे करत आहे. त्यामुळे कृषीवरील पुरुषाचे प्रमाण कमी होण्यास मदत होत आहे. तसेच महिला या प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपला धीर सोडत नाहीत. त्यामुळे आपोआपच कृषी क्षेत्रातील अनेक समस्या सुटण्यास मदत होत आहे. महिला कामगार या सहज व कमी मजुरीवर उपलब्ध होत असल्यामुळे अन्नधान्य उत्पादनाचा खर्च कमी होऊन सर्वांना परवडेल अशा किंमतीत बाजारात अन्नधान्य उपलब्ध होत आहे. त्यामुळे दारिद्रय उपासमारी अशा

2019 - 20

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 22 , Vol. 6 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
February 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

**Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**February 2020 Special Issue- 22 Vol. 6**

# The Role of Women in Global Development

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editor**
**Principal, Dr.Aqueela Syed Gous**

**Shaurya Publication, Latur**

# Index

1. राष्ट्रीय विकास एवं महिला सशक्तिकरण १
डॉ. सय्यद अमर फकिर
2. भारत देश के आजादी के लिए योगदान देनेवाली क्रांतीकारी महिला - दुर्गावती देवी (दुर्गाभाभी) ३
प्रा. गडदे भारती बाबुराव
3. न्यायालयाची भूमिका आणि भारत ५
प्रा.दत्तात्रय जनार्धन चव्हाण
4. गोदाकाठावरील महानुभावीय साहित्यातून अभिव्यक्त होणारी एकात्मता ९
डॉ. बबन श्रीकृष्ण मस्के
5. कृषी क्षेत्र आणि आर्थिक विकास 12
डॉ. अशोक बापूराव देवकर
6. 'जागतिक मानव विकास अहवाल आणि भारताची सद्यस्थिती' १६
प्रा. डॉ. चव्हाण एम.एच., प्रा. डॉ. सावळे एकनाथ ग्यानोबा
7. कृषी विकास आणि भारतीय अर्थव्यवस्था २०
डॉ. देविदास नागरगोजे, डॉ. सावळे ई.जी.
8. भारतीय स्वातंत्र्यपूर्व आंदोलनात महिलांचा सहभाग 24
डॉ. किसन मनोहर पवार
9. स्त्रियांच्या सामाजिक समस्या आणि उपाय योजना २६
डॉ.सौ.मनिषा देशमुख
10. भारतीय शेती शोध आणि बोध २८
डॉ.एन.के.मुळे
11. महिलांच्या समस्या : "एक अभ्यास" ३१
प्रा. डॉ. शामल भिवराव जाधव
12. भारतीय क्रांतीकारी चळवळीत येशूबाई सावरकरांचे कार्य : एक अभ्यास ३४
डॉ. गंगणे आर. व्ही.
13. ग्रामीण महिलांच्या आरोग्य विषयक समस्या: कारणे व उपाय योजना 38
प्रा. डॉ. पंढरी गुट्टे
14. "भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचे योगदान" 41
प्रा. केशव देविदासराव पावडे
15. परभणी जिल्ह्यातील लिंग-गुणोत्तर एक भौगोलिक अभ्यास 45
प्रा. डॉ. खंदारे सिंधु परसराम

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 22 , Vol. 6 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
February 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# 'जागतिक मानव विकास अहवाल आणि भारताची सद्यस्थिती'

**प्रा. डॉ. चव्हाण एम.एच.**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा ता.जि. बीड.

**प्रा. डॉ. सावळे एकनाथ ग्यानोबा**
अर्थशास्त्र विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्याल, पिंपळनेर (ग) ता.जि. बीड.

**प्रस्ताविक (Introduction) :**

२१ व्या शतकात जगातील प्रत्येक देशात मानव विकासाकडे विशेष लक्ष दिले जात आहे. आर्थिक विकासापेक्षा 'मानव विकास' महत्त्वाचा मानला जात आहे. प्रत्येक राष्ट्राचे अंतिम लक्ष मानवाचा सर्वांगीण विकास साधने हा आहे. म्हणजे मानव विकास साध्य असून आर्थिक विकास त्याचे साधन आहे. केवळ देशातील उत्पन्नातील वाढीमुळे देशाचा विकास घडून येत नाही. त्या करीता दारीद्रय, बेरोजगारी, आर्थिक विषमता यावर प्रत्यक्ष हल्ला करून या समस्येचा नायनाट करणे गरजेचे आहे. मानव विकासाचा संबंध गरिबी निर्मुलन, आर्थिक समानता, लिंग समानता, राजकीय समानता, सामाजिक समानता, शैक्षणिक व सांस्कृतिक समानता आणि रोजगार निर्मितीशी आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या मते मानव विकास ही एक बहुआयामी संकल्पना आहे. मानवी विकासाची व्याख्या देतांना ते म्हणतात की, "Human Development as the process of enlarging people's Choices, Said Choices allowing them to lead a long and helthy life, to be educated, to enjoy a decent Standard of living as well as poltical and Various ingredients of Self respect."

मानव विकास कितपत झाला आहे याचे मापन संयुक्त राष्ट्र संघटनेकडून केले जाते. यासाठी मानव विकास निर्देशांकाचा उपयोग केला जातो. अभिमंतपंथीय अर्थशास्त्रज्ञ ॲडम स्मिथ पासून ते अगदी अलिकडील काळातील (१९७०) पर्यंतच्या सर्व अर्थतज्ञांची अशी भूमिका होती की राष्ट्रीय उत्पन्नातील, दरडोई उत्पन्नातील वाढ म्हणजे आर्थिक विकास आणि आर्थिक विकास म्हणजे मानव विकस होय. पण राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ किंवा आर्थिक विकास म्हणजे मानव विकास नव्हे. मानव विकास ही व्यापक संकल्पना आहे. ज्यामध्ये आर्थिक विकासाबरोबरच देशात आर्थिक सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक समानते बरोबरच लिंग समानता असणे अपेक्षीत आहे. प्रत्येक व्यक्तीला जिवन जगण्याचे विविध विकल्प उपलब्ध असले पाहीजे. तसेच दिर्घायुषी, निरोगी, जिवन जगता आले पाहिजे. म्हणजे शिक्षण, आरोग्य, जिवनमान उंचावणारे, पर्यावरण पुरक वातावरण असणे म्हणजे मानव विकास होय.

आज आर्थिक विकासापेक्षा मानव विकास महत्त्वाचा आहे. मानवाचा सर्वांगीण विकास साध्य करणे हे प्रत्येक आर्थिक क्रियामागील प्रमुख कारण आहे. त्यामुळे भारतीय लोकांचा कितपत विकास झाला आहे. भारत मानवी विकास निर्देशांकामध्ये विकासाच्या कोणत्या टप्प्यावर आहे. या सर्व बाबीचा आढावा घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केली आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये (Objective)**

१) मानव विकासाचा अर्थ स्पष्ट करणे.
२) मानव विकास मापनाच्या विविध निर्देशांकाचा अभ्यास करणे.
३) मानव विकास निर्देशाकांचा अभ्यास करणे.
४) भारताच्या मानव विकासाच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती (Methodology)**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीयक साधन सामग्रीचा आधार घेण्यात आला असून यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ मासीके, दैनिके, शासकीय प्रकाशने, UNDP चा अहवाल आणि संकेतस्थळे इत्यादीचा प्रमुख्याने उपयोग केलेला आहे.

**गृहितके (Hypothesis)**

१) प्रत्येक राष्ट्र आर्थिक विकासापेक्षा मानव विकासाकडे विशेष लक्ष देत आहे.
२) UNDP मानव विकास निर्देशांकाद्वारे मानव विकासाचे मापन करून अहवाल प्रसिद्ध करते.
३) जगातील राष्ट्राची विकसीत, विकसनशील व अविकसीत अशी विभागणी मानव विकास निर्देशांकावरून केली जात आहे.

**मानव विकासाचा अर्थ (Meaning of Human Development) :** सर्वसामान्यपणे आर्थिक विकास किंवा आर्थिक वृद्धी म्हणजे मानव विकास असे म्हटले जाते. परंतू तसे नाही. मानव विकासाची संकल्पना आर्थिक विकासाच्या संकल्पनेपेक्षा व्यापक आहे. आर्थिक विकासाच्या सहाय्याने मानव विकास साध्य केला जातो. मात्र मानव विकासात आर्थिक विकाससोबत सामाजिक, राजकीय, शिक्षण, आरोग्यविषयक विकास अभिप्रेत आहे. तसेच यात सकस आहार, स्वच्छ पाणी, निरोगी आरोग्य, उच्च जिवनमान, दिर्घायुष्य आणि स्वच्छ पर्यावरण आदी बाबीचा समावेश होतो. मानव विकासाचा अर्थ अधिक स्पष्ट होण्यासाठी काही तज्ञ व्यक्ती आणि संस्थानी मानव विकासाचा सांगीतलेला अर्थ पाहणे आवश्यक आहे.

**१) जागतिक बँक (World Bank) :** 'मानव विकास म्हणजे' मानवाच्या दर्जात वाढ करणे होय. ही जिवनमानातील वाढ केवळ उत्पादनातील वाढीमुळे घडुन येत नसून त्याकरीता चांगल्या प्रकारचे शिक्षण, उच्च प्रतीचे आरोग्य, पौष्टीक आहार, दारीद्रय निर्मुलन, स्वच्छ हवामान, आणि उच्च दर्जाच्या सांस्कृतीक मुल्यांची निर्मीती होणे आवश्यक आहे.

**२) संयुक्त राष्ट्र संघटना (UNO) :**

मानव विकास ही सतत चालणारी प्रक्रिया असून त्यात मानवाला चांगल्या जिवनमानाच्या अनेक संधी सहज उपलब्ध झाल्या पाहीजे. ज्यात निरोगी जिवन, शिक्षण, स्वच्छ पर्यावरण, राजनैतिक स्वातंत्र्य, मानव अधिकाराची शश्वती आणि आत्मसन्मान आदि बार्बीचा समावेश असणे आवश्यक आहे.

**३) अमर्त्य सेन :**

मानव विकास म्हणजे केवळ आर्थिक वृद्धी किंवा आर्थिक गरजाची पुर्तता नसून मानव जे जिवन जगतात आणि जी स्वातंत्र्य उपभोगतो त्याचा दर्जा वाढविण्या संबंधी आहे. यामुळे व्यक्तीच्या आरोग्यात, शिक्षणात, क्षमतेत आणि सामाजिक कल्याणात वाढ झाली पाहीजे.

**४) प्रो. मायकेल पी. टोडोरो आणि प्रो. एस.सी. स्मिथ :**

मानव विकास ही बहुआयामी प्रक्रीया असून या प्रक्रीयेत सामाजिक रचनेत मोठ्या प्रमाणात बदल, वास्तववादी प्रवृत्ती, राष्ट्रीय संस्थामध्ये बदल, आर्थिक वाढीला चालना, आर्थिक विषमता कमी करणे, दारिद्रय कमी करणे, इत्यादीचा अंर्तभाव होतो. तसेच या प्रक्रीयेत व्यक्तीच्या आणि समाजाच्या मुलभूत गरजांची आणि इच्छांची पुर्तता होऊन त्यांच्या भौतिक व आनंदी जिवनाचा दर्जा उंचावण्यासाठी संपुर्णता सामाजिक पद्धतीमध्ये सार्वत्रीक बदल होणे म्हणजे मानव विकास होय.

एकंदरीत मानवाचा सर्वांगीण विकास मानव विकास संकल्पनेत अभिप्रेत आहे. मानव विकास ही मानवाच्या निवडीची कक्षा व्यापक करण्याची तसेच व्यक्तीच्या कल्याणाची पातळी उंचावण्याची प्रक्रीया मानली जाते.

**मानव विकास मापनाचे विविध निर्देशांक :**

जागतिक स्तरावर संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) ने विविध देशामधील मानव विकासाचा स्तर मोजण्यासाठी विविध निर्देशांकाची रचना केली आहे. यात पुढील पाच निर्देशांकाचा समावेश होतो.

१) मानव विकास निर्देशांक (Human Development Index)

२) असमानता समायोजित मानव विकास निर्देशांक (Inequility adjusted Human Development Index (IHDI))

३) लैंगीक असमानता निर्देशांक (Gender Inequality Index (GII))

४) बहुआयामी दारिद्रय निर्देशांक, (Multi Dimensional Poverty Index (MPI)

५) लिंग विकास निर्देशांक (Gender Development Index (GDI)

या पाच निर्देशांका वरून मानव विकासाचे मापन केले जाते. यात प्रामुख्याने आरोग्य, शिक्षण, जिवनमानाचा दर्जा, जनन, आरोग्य, महिला सबलीकरण, श्रमबाजार, पोषन, बालमर्त्यता, मालमत्ता, वीज, पाणी, स्वच्छतागृहे, स्वयंपाकाचे इंधन, जमीन (अस्वच्छ जमीनीवरील जगणे) आदी बाबींचा विचार करून मानव विकासाचे मापन केले जाते.

**मानव विकास निर्देशांक (HDI)**

मानवाचा विकास कितपत झाला याचे मापन कसे करावे या विषयी १९९० साली पाकिस्तानी अर्थतज्ञ महेबुब-उल-हक आणि भारतीय अर्थतज्ञ अमर्त्य सेन यांनी एक निर्देशांक (पॅरामीटर) तयार केला. हा निर्देशांक तयार करण्यासाठी देशातील नागरिकाचे सरासरी आयुर्मान, शिक्षण आणि दरडाई उत्पन्न या तीन घटकाचा विचार केला. सन १९९० साली पहिला मानव विकास निर्देशांक अहवाल जाहीर केला. त्यानंतर प्रत्येक वर्षी UNDP कडून मानव विकास निर्देशांक अहवाल प्रसिद्ध केला जातो. या निर्देशांकाच्या आकडेवारी वरून जगातील देशाचे विकसीत, विकसनशील व अविकसीत असे वर्गीकरण केले जाते.

**मानव किवास निर्देशांकाचे मापन :**

सन २०१० पासून संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) कडून मानव विकास मापनासाठी नवीन पद्धतीचा अवलंब केला जात आहे. मानव विकास निर्देशांक आरोग्य, शिक्षण व जिवनमानाचा दर्जा या तीन निकषावरून काढला जातो. हे तीन निकष पुढील चार निर्देशांकावरून काढतात.

**१) आरोग्य निर्देशांक :**

देशाच्या आरोग्याचा स्तर मोजण्यासाठी जन्माच्या वेळचे आर्युमान हा निर्देशांक वापरला जातो. या निर्देशाकाचे किमान मुल्य २५ तर कमाल मुल्य ८५ असते.

**२) शिक्षण निर्देशांक :**

देशाचा शैक्षणिक स्तर मोजण्यासाठी पुढील दोन निर्देशांक वापरतात.

A) २५ वर्षाहून अधिक वयाच्या प्रौढाची सरासरी शालेय वर्ष

B) १८ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलाची अपेक्षीत शालेय वर्ष

या निर्देशांकाचे किमान मुल्य ० (शून्य) तर कमाल मुल्य त्यावर्षी आढळलेल्या एखादया देशाच्या सर्वाधिक मुल्या इतके असते.

**३) जिवनमानाचा निर्देशांक :**

देशाच्या जिवनमानाचा स्तर मोजण्यासाठी दरडाई स्थुल राष्ट्रीयउत्पन्न हा निर्देशांक वापरला जाते. या निर्देशांकाचे किमान मुलय १०० डॉलर तर कमाल मुल्य ७५००० डॉलर इतके असते.

या प्रत्येक निकषाचे मुल्य पुढील सुत्रानुसार काढले जाते. ते शुन्य ते एकच्या दरम्यान असते.

सुत्र - निकषाचे मुल्य = (प्रत्यक्ष मुल्य - किमान मुल्य) / (कमाल मुल्य - किमान मुल्य)

या तीन निर्देशांकाचा भूमितीय मध्य काढून मानव विकास निर्देशांक तयार केला जातो. त्यासाठी पूढील सुत्राचा वापर केला जातो.

सुत्र - मानव विकास निर्देशांक = $\sqrt[३]{\text{आरोग्य निर्देशांक} \times \text{शैक्षणिक निर्देशांक} \times \text{जिवनमानाचा निर्देशांक}}$

मानव विकास निर्देशांकाचे मुल्य (०) शन्य ते १ च्या दरम्यान असते. (शुन्य) म्हणजे मानव विकास झालेला नाही आणि १ म्हणजे पुर्ण मानवविकास झालेला आहे. असा त्याचा अर्थ होतो. या मानव विकास निर्देशांकाच्या आधारे जगातील विविध देशाची वर्गवारी पुढील चार गटात केली जाते.

१) अतिउच्च मानव विकास गट - ०.८०० पेक्षा जास्त मुल्य
२) उच्च मानव विकास गट - ०.७०० ते ०.७९९
३) मध्यम मानव विकास गट - ०.५५७ ते ०.६९८
४) कमी मानव विकास गट - ०.५४९ पेक्षा कमी मुल्य

**भारताचे मानव विकास निर्देशांक (HDI) मधील स्थान :**

भारताने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आर्थिक विकासासाठी विविध स्तरावर प्रयत्न केले आहेत. १९८० च्या दशकापासून भारतात कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेवर विशेष भरदेण्यात आला आहे. आनेक कल्याणकारी योजना राबण्यिात आल्या आहेत. अलिकडच्या काळात डिजिटालायझेशन (Digitalization) मेक इन इंडिया (Make in India) स्मार्ट सिटी (Smart City).

स्वच्छ भारत (Clean India) स्मार्ट व्हिलेज (Smart Village), स्टार्टअप (Start Up) यांचा विकास हा मानव विकासाचा भाग आहे. राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्नात वाढ करून सामाजिक कल्याणात वाढ घडवून आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले आहे. त्यामुळे १९९० पासून मानव विकास निर्देशांकाच्या कामगीरीत चांगली वाढ झालेली दिसून येते.

२०१९ च्या मानव विकास अहवालात भारत १८९ देशाच्या यादीत १२९ व्या क्रमांकावर आहे. तो मागच्या वर्षी २०१८ मध्ये १३० व्या क्रमांकावर होता. १९९० ते २०१८ पर्यंत भारताच्या मानव विकास निर्देशांक मुल्यात ५०% वाढ झाली आहे. ही वाढ ०.४३१ पासून ०.६४७ पर्यंत झाली आहे. तर आर्युमानात ११.६ वर्ष, शाळेत जाण्याच्या सरासरी मध्ये ३.५ वर्ष आणि दरडोई उत्पन्नात २५० टक्के ने वाढ झालेली आहे. २०१९ च्या मानव विकास निर्देशांकामधील भारताची स्थिती पहाता असे लक्षात येते की भारताचा १८९ देशाच्या यादीत मानव विकास निर्देशांकाच्या ०.६४७ मुल्यांसह १२९ व्या क्रमांकावर आहे. यामध्ये आर्युमान ६९.४ वर्ष, अपेक्षीत शैक्षणिक मुल्य १२.३, सरासरी शैक्षणिक मुल्य ६.५ आणि दरडोई उत्पन्न मुल्य ६८२९ डॉलर एवढे आहे. यावरून असे लक्षात येते की मागील तीन दशकात भारताची मानव विकास निर्देशांकातील कामगीरी समाधानकारक आहे.

पुढील तक्त्यात जगातील काही निवडक देशातील २०१९ च्या UNDP च्या मानव विकास निर्देशांकातील क्रमवारी दर्शविली आहे.

**जगातील निवडक देशातील मानव विकास निर्देशांकातील क्रमवारी (२०१९)**

| देश | HDI क्र | HDI चे मुल्य | सरासरी आर्युमान | अपेक्षीत शैक्षणिक मुल्य | सरासरी शैक्षणिक मुल्य | दरडोई उत्पन्न (GNP) डॉलर मध्ये |
|---|---|---|---|---|---|---|
| नार्वे | १ | ०.९५४ | ८२.३ | १८.१ | १२.६ | ६५०५९ |
| स्वीत्झर्लँड | २ | ०.९४६ | ८३.६ | १६.२ | १३.४ | ५९३७५ |
| आर्यलँड | ३ | ०.९४२ | ८२.१ | १८.१ . | १२.५ | ५५६६० |
| जर्मनी | ४ | ०.९३९ | ८१.२ | १७.१ | १४.१ | ४६९४६ |
| हाँगकाँग | ४ | ०.९३९ | ८४.७ | १६.५ | १७.० | ६०२२१ |
| श्रीलंका | ७१ | ०.७८० | ७६.८ | १४.० | ११.१ | ११६११ |
| चीन | ८५ | ०.७५८ | ७६.७ | १३.९ | ७.९ | १६१२७ |
| भारत | १२९ | ०.६४७ | ६९.४ | १२.३ | ६.४ | ६८२९ |
| बांग्लादेश | १३५ | ०.६१४ | ७२.३ | ११.२ | ६.१ | ४०५७ |
| पाकिस्तान | १५२ | ०.५६० | ६७.१ | ८.५ | ५.२ | ५१९० |
| नायजेरिया | १८९ | ०.३७७ | ६२.० | ६.५ | २.० | ९१२ |

Source UNDP Report 2019

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, UNDP च्या मानव विकास अहवालात (HDI) सर्वांत वरच्या स्थानी नार्वे हा देश असून त्याचे HDI मुल्य ०.९५४ एवढे आहे. त्यानंतर स्वीर्त्झलँड, आर्यलँड, जर्मनी, हॉंगकॉंग यांचा क्रमांक आहे. सर्वात शेवटी नायजेरीया देशाचा १८९ वा क्रमांक आहे आशिया खंडातील भारताच्या शेजारील राष्ट्रामध्ये श्रीलंका व चीन या देशाचे HDI मधील स्थान भारतापेक्षा वरच्या स्थानी आहे. याचा अर्थ भारतापेक्षा श्रीलंका व चीन या देशात मानवी विकास जास्त प्रमाणात झाल्याचे दिसून येते.

**सारांश :**

आधुनिक काळात राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न, किंवा केवळ पैसा हा देशातील लोकांची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक, पर्यावरण विषयक, दिर्घायुषी सुस्थिती निर्माण करू शकत नाही. त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघटनेने आर्थिक विकास, आर्थिक वृद्धी ऐवजी 'मानव विकास' या संकल्पनेचा पुरस्कार केला आहे. संयुक्त राष्ट्र संघाने मानवी विकासाची व्याख्याच 'लोकांच्या निवडीच्या विस्ताराची प्रक्रीया अशी केली आहे.' मानव विकासाच्या घटकांमध्ये दिर्घ व आरोग्यदायी जिवन, शिक्षण व उत्तम राहणीमानाचा दर्जा याचा समावेश केला आहे. तर इतर निवडीमध्ये राजकीय स्वातंत्र्य, मानवी हक्कांची हमी, स्वावलंबन आणि आत्मप्रतिष्ठेचे विविध घटक यांचा समावेश केला आहे. या अत्यावश्यक निवडी आहेत त्यांच्या अभावी लोकांना इतर अनेक संधीपासून वंचीत रहावे लागू शकते. यावरून असे स्पष्ट हेते की मानवी विकासात लोकांच्या निवडीच्या विस्ताराच्या प्रक्रीयेबरोबरच सुस्थिती उंचावण्याची ही प्रक्रीया आहे. म्हणून लोकांना विकासाच्या भोवती रचण्याऐवजी विकास लोकाभोंवती रचला पाहीजे. त्यामुळे विकास लोककेंद्रीत बनेल. तसेच विकास हा लोक सहभागायुक्त असावा आणि त्यासाठी लोकांना आपल्या क्षमतामध्ये आरोग्य, शिक्षण, व प्रशिक्षण विषयक सुधारणा करण्यासाठी, गुंतवणुकीच्या संधी उपलब्ध असल्या पाहीजे. त्यासाठी त्यांना सामुदायीक निर्णयामध्ये पुर्णपणे सहभागी होता आले पाहीजे आणि मानवी, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्याचा लाभ प्राप्त झाला पाहीजे. असा मानवी विकास होण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ :**


१) Datta & Sundharam - Indian Economy S. Chand Publishing New Delhi २०१४.

२) भारतीय अर्थव्यवस्था - अतिरिक्त अंक प्रतियोगीता दर्पण २०१७.

३) डॉ. जी.एन. झामरे - भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र पिंपळापुरे अँड कं. पब्लीशर्स नागपूर - २०१५.

४) अर्थसंवाद - मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासीक जुलै - सप्टेंबर २००३ खंड २७. अंक २

५) Human Development Report, २००९, २०१९.)

६) www.UNDP.org.

2019 - 20

Chinmay Publication Aurangabad ISBN-978-93-84593-96-4

Souvenir

Indian Council of Social Science Research

National Seminar on

# BLACK MONEY AND ITS IMPACT ON INDIAN ECONOMY

*29th August 2019*

Sponsored by

## INDIAN COUNCIL OF SOCIAL SCIENCE RESEARCH (ICSSR) NEW DELHI

Organized by

Department of Economics

Mrs. Kesharbai Sonajirao Kshirsagar Alias Kaku Ats, Science and Commerce College, Beed (M.S.)-431122

NAAC Re-Accredited 'A' Grade with 3.18 (CGPA)

ISO 9001-2015 Certified

 ISBN-978-93-84593-96-4


| Sr. No. | Title of the Papers | Name of Authors | Page No. |
|---|---|---|---|
| 45 | भ्रष्टाचार रोखण्यामधील प्रसारमाध्समांची भूमीका आणि कार्य | रामानंद व्यवहारे | 143 |
| 46 | काळा पैसा व भारतीय अर्थव्यवस्थेव होणारे परीणाम | हांगे ए.एस.<br>चौधरी व्ही.एम. | 147 |
| 47 | काळा पैसा आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परीणाम | हनूमत भुमकर<br>कोकाटे जी.एस. | 150 |
| 48 | काळ्या पैशासंदर्भात भारतीय अर्थव्यवस्थेची वास्तवीक परीस्थीती आणि परीणांमाचे विश्लेशन | डी.डी.भोसले | 153 |
| 49 | काळ्या पैशाचे भारतीय अर्थव्यबस्थेवरीले परीणाम | बोडगे एस.जी.. | 156 |
| 50 | भारतीय अर्थव्यवस्थेवर काळ्या पैशाचे झालेले परीणाम | मनिषा चौधरी | 158 |
| 51 | काळ्या पैसा व भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परीणाम | हांगे ए.एस.<br>चौधरी व्ही.एम. | 160 |
| 52 | काळ्या पैशाचे अर्थव्यवस्थेवरील परीणाम | के.एस.घोडके | 163 |
| 53 | भारतीय अर्थव्यवस्थेवर काळ्या परीणाम | रामदास मुक्टे | 166 |
| 54 | काळ्या पैशामुळे भारतातील समाजावर होणारे परीणाम | राठोड सुभाष | 169 |
| 55 | काळा पैसा आणि भारतीय अर्थव्यवस्था | साबळे एकनाथ | 172 |
| 56 | भारतीय अर्थव्यवस्था: निश्चलनीकरण आणि काळा पैसा | राम ताटे | 175 |
| 57 | भारतीय अर्थव्यवस्थेवर काळ्या पैशाचा परिणाम | सि.एस. वाकोडे<br>सि.एन. कोकाटे | 177 |
| 58 | काळा पैसा : भारतीय अर्थ व्यवस्थेवरील परिणाम | एस.जी.बिराजदार<br>एस.ए.सांगळे | 180 |
| 59 | भ्रष्टाचार : समाजाला लागलेली वाळवी | शिवाजी चौगुले | 1833 |
| 60 | भारतातील काळा पैसा : परिणाम व उपाय | शेळके सी.एस. | 186 |
| 61 | काळा पैसा एक सामाजिक समस्या | खेत्री एच.आर. | 190 |
| 62 | भारतातील काळा पैसा : कारणे, परिणाम व उपाय | डॉ. चव्हाण एम.एच. | 193 |
| 63 | भारतातील काळया पैशावर नियंत्रण : एकज्दृष्टोक्षेप | राम शेवलीकर | 198 |
| 64 | भारताचा काळा पैसा व भ्रष्टाचाराविरुध्दचा लढा | पोटे बी.टी | 200 |
| 65 | काळ्या व्यवहाराचे भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रातील परिणाम. | दत्तात्रय नटके | 204 |
| 66 | भारतीय अर्थव्यवस्था आणि काळा पैसा | देविदास नागरगोजे | 206 |

ISBN-978-93-84593-96-4

# भारतातील काळा पैसा : कारणे, परिणाम व उपाय

प्रा.डॉ. चव्हाण एम.एच.
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि. बीड.

## प्रास्ताविक (Introduction)

भारत आर्थिक महासत्तेकडे वाटचाल करत असतांना भारताला लोकसंख्या वाढ, बेकारी, दारिद्र्य, अज्ञान, निरक्षरता, नैसर्गिक आपत्ती, प्रदूषण, आतंकवाद अशा समस्येला सामोरे जावे लागत आहे. शिवाय भ्रष्टाचार आणि त्यामधून निर्माण होणारा काळा पैसा आर्थिक विकासातील अडथळा ठरत आहे. भारतात काळ्या पैशाच्या रुपाने अधिकृत अर्थव्यवस्थेइतकीच किंवा तिच्याहून मोठी समांतर अर्थव्यवस्था कार्यरत असल्याचे दिसून येते.

देशातील काळ्या पैशाची समस्या नवी नाही तर प्राचीन कालखंडात देखील अस्तित्त्वात होती. परंतु तिचे प्रमाण अल्प होते. काळ्या पैशाची समस्या ही विशिष्ट देशापुरती मर्यादित नसून आज जगातील विकसित आणि अविकसित देशांनाही भेडसावत आहे. आज स्वीस बँकेमध्ये जगातील विविध राष्ट्रांतील श्रीमंत लोक काळा पैसा ठेवतांना दिसतात. भारतातील अनेक लोकांनी कोट्यावधी रुपये स्वीस बँकेत ठेवलेले आहेत. या काळ्या पैशाचे आकडे सामान्यच काय उच्चशिक्षित माणसांनाही चक्रावून टाकणारे आहेत. संपूर्ण देश हा राजकारणी, उद्योगपती व इतर व्यक्तीद्वारे लपविलेल्या काळ्या पैशाच्या व्याप्तीवर चर्चा करत आहे. मागील कांही वर्षापासून अशी अविवादित चर्चा आहे की जर या लोकांनी लपविलेला काळा पैसा विकासासाठी वापरला तर भारत देश जगातील सर्वात मोठी आर्थिक महासत्ता बनेल.

प्रस्तुत शोधनिबंधात भारतातील काळ्या पैशाचे प्रमाण, त्याची कारणे, परिणाम व उपाय यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

## शोधनिबंधाची उद्दिष्टे (Objective)

1. काळ्या पैशाचा अर्थ स्पष्ट करणे.
2. काळ्या पैशाच्या निर्मितीच्या कारणांचा अभ्यास करणे.
3. काळ्या पैशाचे अर्थव्यवस्थेवर होणारे परिणामाचा अभ्यास करणे.
4. काळा पैसा कमी करण्यासाठी उपाय सूचविणे.

## अभ्यास पद्धती (Methodology)

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधन सामग्रीचा आधार घेतला असून त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, दैनिक वर्तमानपत्रातील लेख, मासिके, संशोधन अहवाल, संकेतस्थळे, इत्यादींचा आधार घेतलेला आहे. वरील उद्दिष्ट्ये व त्याला अनुसरुन सामग्री संग्रहण करुन विश्लेषण केले आहे.

## काळ्या पैशाचा अर्थ (Meaning of Black Money)

1. अवैध व्यवहारातून निर्माण होणाऱ्या पैशास काळा पैसा असे म्हणतात.
2. काळा पैसा म्हणजे सरकारी पैशाचे रुपांतर वैयक्तिक पैशात करणे होय. म्हणजे पैसा गैरमार्गाने कमावणे किंवा कमावलेल्या पैशावरील कर सरकारला न भरणे होय.
3. ज्या पैशाची राष्ट्रीय उत्पन्नात नोंद होत नाही, जो पैसा सतत लपविण्याचा प्रयत्न केला जातो अशा पैशाला काळा पैसा असे म्हणतात.
4. जेव्हा लोक अवैध मार्गाने साधन संपत्तीचा साठा करतात तेव्हा त्या साठ्यास काळा पैसा असे म्हणतात.

थोडक्यात कर अधिकाऱ्यापासून लपविलेला पैसा म्हणजे काळा पैसा होय. हवाला बाजाराचा या काळ्या पैशाशी जवळचा संबंध आहे. अर्थव्यवस्थेतील काळ्या पैशामुळे समांतर अर्थव्यवस्था निर्माण होते. अशा अर्थव्यवस्थेत विविध अवैध व्यवहारातून काळा पैसा निर्माण होतो. जीवनावश्यक वस्तूची टंचाई निर्माण करणे, सरकारने ठरवून दिलेल्या किंमतीपेक्षा अधिक किंमतीने वस्तूची विक्री करणे, कर चुकविण्यासाठी उत्पन्न कमी दाखविणे, मालमत्तेच्या खरेदी-विक्री व्यवहारात अधोमूल्यन करुन नोंदणी व मुद्रांक शुल्क कमी करणे, भांडवली लाभावरील कर चूकविणे, लाच देणे, घेणे अशा अनेक प्रकारच्या बेकायदेशीर व्यवहाराची अधिकृतपणे कोठेही नोंद झालेली नसते व अशा व्यवहारातून निर्माण झालेला पैसा उघडकीसही आणला

ISBN-978-93-84593-96-4

जात नाही. तसेच त्याची राष्ट्रीय उत्पन्नात गणनाही केली जात नाही. त्यामुळे अशा पैशाला काळा पैसा असे संबोधले जाते. यालाच बिनहिशोबी पैसा असेही म्हणतात.

भारतातील काळा पैसा (Black Money in India)

भारतात नियोजित विकासाबरोबर राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत गेलेली दिसून येते. या नियोजित विकासाबरोबर अनेक आर्थिक घोटाळे व काळ्या पैशाचे प्रमाणही वाढत गेले आहे.

भारतात अनेक तज्ञ व्यक्ती आणि संस्थांनी भारतातील काळ्या पैशा विषयी अंदाज व्यक्त केले आहे.

कॅल्डोर समितीने 1956 मध्ये आपल्या कर सुधारणा अहवालात भारतात प्रतिवर्षी 200 ते 300 कोटी रुपयांचा कर बुडविला जातो. त्यामुळे काळा पैसा निर्माण होत असल्याचा निष्कर्ष काढला आहे. प्रत्यक्ष कर चौकशी समितीचे अध्यक्ष वांछु यांनी भारतामध्ये सन 1968-69 मध्ये 1400 कोटी रुपयांचा काळा पैसा निर्माण झाल्याचे आपल्या निष्कर्षात नमूद केले आहे.

पुनम गुप्ता व संजीव गुप्ता यांनी 1978-79 मध्ये भारतात बेहिशोबी पैशाचे प्रमाण 46867 कोटी रुपये असल्याचे मत मांडले आहे.

नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक फायनान्स ॲण्ड पॉलिसी या संस्थेने 1983-84 मध्ये भारतात काळा पैसा 36786 कोटी रुपये असल्याचा व त्याचे एकूण राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण 19 ते 21 टक्के असल्याचा अंदाज व्यक्त केला. सन 1960-61 मध्ये एकूण राष्ट्रीय उत्पन्नाशी काळ्या पैशाचे प्रमाण 6 टक्के होते. ते 1987-88 मध्ये 20.7 इतके प्रचंड वाढले आहे.

सन 2007 मध्ये स्विस बँक असोशिएशनच्या 2006 च्या अहवालाप्रमाणे स्विस बँकेत कोणत्याही देशातील नागरिकापेक्षा भारतीयांचा जास्त पैसा 1456 अब्ज डॉलर एवढा पैसा परदेशात नेण्यात आला. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) च्या सर्वेक्षणानुसार भारतात एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या 50% एवढा काळा पैसा असल्याचे मत व्यक्त केले आहे.

नॅशनल काऊंसील ऑफ अप्लाईड इकॉनॉमिक रिसर्च (एनसीएईआर) नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फायनान्शियल मॅनेजमेंट (एनआयएफएम) तसेच नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ पब्लिक पॉलीसी ॲण्ड फायनान्स (एनआयपीएफ) या तीन संस्थांनी भारतातून 1980 ते 2010 या कालावधीत जवळपास 1725300 कोटी रुपये ते 3430000 कोटी रुपये इतका काळा पैसा परदेशात गेल्याची आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. या संस्थांच्या आकडेवारीवरुन संसदेत एक अहवाल सादर करण्यात आला होता. रियल इस्टेट, खाणकाम, फार्मासिटीकल, पानमसाला, गुटखा, तंबाखू, चित्रपट, शिक्षण या क्षेत्रामधून काळ्या पैशाची निर्मिती मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे निरीक्षण या अहवालात नमुद करण्यात आले.

काळा पैसा मोजण्याची कोणतीही सर्वमान्य पद्धत नसल्यामुळे भारतात काळ्या पैशाचे प्रमाण निश्चित किती आहे हे अचूक सांगता येणे शक्य नाही. शेवटी हे अंदाज आहे. परंतु जगातील अन्य काही देशाच्या तुलनेत भारतात काळ्या पैशाचे प्रमाण अधिक असल्याचे विविध अभ्यासावरुन दिसून येते.

काळ्या पैशाच्या निर्मितीची कारणे (Causes of Black Money)

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये काळ्या पैशाच्या निर्मितीसाठी आर्थिक, सामाजिक, राजकीय कारणे जबाबदार आहेत. त्यामध्ये पुढील कारणांचा समावेश होतो.

1. कर चुकवेगिरी

काळ्या पैशाचे उगमस्थान हे करचुकवेगिरीपणात आहे. भारतात नोकरदार वर्गच खरे उत्पन्न दाखवून त्यावर कर भरतो. परंतु अनेक व्यवसाय करणारे लोक खरे उत्पन्न सरकारला दाखवित नाहीत. तसेच भारतात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कराचे दर इतर देशाच्या तुलनेत जास्त असल्यामुळे 70 ते 75 टक्के संस्था सरकारला आपली संपत्ती प्रामाणिकपणे दाखवित नाही. जेवढे उत्पन्न कमी दाखविले जाते त्याचे रुपांतर काळ्या पैशामध्ये किंवा बेहिशोबी पैशात होते.

2. लाचलुचपतीच्या प्रमाणात वाढ

देशात सर्वच क्षेत्रात अवैध रितीने देण्यात येणाऱ्या लाचेचे प्रमाण वाढत आहे. यात विविध परवाने मिळविण्यासाठी शासकीय अधिकारी, मंत्री, राजकीय पुढारी यांना दिली गेलेली लाच, विनापरवानगी दारुची दुकाने, रॉकेल, धान्य यांचा काळा बाजार अशी अनेक कामासाठी व स्वतःच्या स्वार्थासाठी लाच देऊन कामे करुन घेण्याच्या प्रमाणात वाढ होत असल्याने काळ्या पैशाच्या प्रमाणात वाढ होत आहे.

ISBN-978-93-84593-96-4

### 3. भ्रष्टाचारात वाढ

केंद्र व राज्य सरकार देशाच्या सर्वांगिण विकासासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च करतात. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, औद्योगिकीकरण इत्यादींचा खर्च सरकारी खात्यामार्फत अधिकारी व नोकरवर्गाकडून केला जातो. हा खर्च करतांना भ्रष्टाचाराच्या रुपाने काळा पैसा निर्माण होतो. 2007 मध्ये जगातील 180 देशांत भ्रष्टाचार निर्देशांकात भारताचा 72 चा क्रमांक होता.

### 4. भाववाढ

देशात सातत्याने होणारी भाववाढ सुद्धा करापासून वाचविण्यासाठी लोकांना कर बुडवेगिरीस मजबूर करत आहे. कारण भाववाढीमुळे वास्तव उत्पन्नात घट होत असते. म्हणून चांगले उत्पन्न असणारे सरकारी कर्मचारी सुद्धा आपल्या पदाचा गैरवापर करुन लाच घेतांना दिसत आहे. त्यामुळे काळ्या पैशाला चालना मिळत आहे.

### 5. उत्पादन कमी दाखविणे .

उत्पादन शुल्क चुकविण्यासाठी अनेक उत्पादक आपल्या उत्पादनाचे प्रमाण कमी दाखवून उत्पादन शुल्क बुडवितात. तसेच उत्पादनाशी संबंधीत करही बुडवितात. त्यामुळेही काळ्या पैशात वाढ होते.

### 6. मालमत्तेचे वास्तव मूल्य न दाखविणे

भारतात स्थावर मालमत्तेच्या खरेदी-विक्री व्यवहारात वास्तव मूल्य दाखविले जात नाही. नोंदणी शुल्क, मुद्रांक शुल्क तसेच भांडवली लाभ कर कमी करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला जातो. यामुळे काळ्या पैशाची निर्मिती होते.

### 7. चारित्र्यसंपन्न लोकांचा अभाव

ज्या देशात चारित्र्यसंपन्न लोक असतात त्या देशात भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी राहते. कारण असे लोक निश्चितपणे भ्रष्टाचार करत नाही. पण असे लोक आपल्या देशात कमी आहेत. यामुळे भ्रष्टाचार, लाचलुचपत यांचे प्रमाण वाढून काळ्या पैशाची निर्मिती होत आहे.

## काळ्या पैशाचे परिणाम (Effect of Black Money)

### 1. विषमतेत वाढ

भारतात काळ्या पैशाच्या प्रमाणात सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे उत्पन्न आणि संपत्ती यामध्ये प्रचंड प्रमाणात विषमता वाढत आहे. याचा प्रतिकुल परिणाम आर्थिक विकासावर होत आहे.

### 2. राष्ट्रीय साधन सामग्रीचा गैरवापर

देशातील काळा पैसा वैध व्यवसायात न गुंतविता अवैध मार्गाने चालणाऱ्या व्यवसायात गुंतविला जातो. हा पैसा इमारत, जमीन खरेदी, सोने, चांदी अशा खरेदीसाठी वापरला जातो. अशा खरेदीवर कर चूकविला जातो. त्यामुळे सरकारचे कर योग्य उत्पन्न बुडते. आर्थिक विकास कामाला या पैशाचा उपयोग होत नाही. त्यातून राष्ट्रीय साधन सामग्रीचा गैरवापर होतो.

### 3. सरकारच्या उत्पन्नात घट

देशातील उद्योगपती, राजकीय व्यक्ती, अभिनेते, व्यापारी मोठ्या प्रमाणात कर चुकवितात. त्यामुळे सरकारच्या उत्पन्नात घट होते.

### 4. देशात भाववाढीची परिस्थिती निर्माण होणे

गैरमार्गाने मिळविलेला काळा पैसा लोकांना स्वतःच्या नावे बँकेत ठेवता येत नाही. असा काळा पैसा लोक काळाबाजार, सट्टेबाजी, जीवनावश्यक वस्तुची साठेबाजी करुन कृत्रिम टंचाई निर्माण करण्यासाठी करतात, त्यामुळे भाववाढीला चालना मिळत आहे.

### 5. समांतर अर्थव्यवस्थेची निर्मिती

देशात राष्ट्रीय उत्पन्न व सरकारी खर्च वाढत गेल्यावर काळ्या पैशाचे राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाणही वाढत गेले. [illegible], काळा बाजारवाले यांचे प्रभुत्व वाढल्यामुळे अशा लोकांनी काळ्या पैशाच्या आधारे देशात समांतर अर्थव्यवस्थाच निर्माण केली आहे. काळ्या पैशाचे प्रमाण वाढत असल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था गंभीर संकटात सापडत असल्याचे दिसून येत आहे.

 ISBN-978-93-84593-96-4

**6. नैतिक मूल्याचा ऱ्हास**

काळ्या पैशामुळे समांतर अर्थव्यवस्था उदयास आली आहे. यामुळे नैतिक मूल्याचा ऱ्हास होत आहे. सामाजिक नैतिक संकल्पना कमकुवत झाल्या आहे. समाजात आपूलकी, नैतिकता, आत्मीयता, सामाजिक नाते यांचे अस्तित्त्व संपूष्टात आलेले दिसून येत आहे.

**7. बेरोजगारी व गुन्हेगारीत वाढ**

भ्रष्टाचार, काळा पैसा यामुळे रोजगार कमी होऊन बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. बेरोजगारीच्या परिस्थितीमुळे तरुण हतबल झाल्याने स्वत:चा व कुटुंबियांचा उदरनिर्वाह करण्यासाठी तस्करी, आंतकवाद, चोरी इत्यादी प्रकारच्या गंभीर कारवायात सहभागी होत आहेत.

**8. देशाच्या प्रतिष्ठेवर परिणाम**

काळा पैसा, भ्रष्टाचार जगभरातील देशाच्या प्रतिष्ठेवर परिणाम करत आहे. दुसऱ्या देशातील व्यापारी, गुंतवणूकदार भारतातील वाढत्या भ्रष्टाचारामुळे चिंतीत असून भारतात व्यवसाय करण्यास उत्सुक होत नाही. त्यामुळे देशाची पत खालावते.

**9. राजकारणात गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा प्रवेश**

बेकायदेशीर व्यवसाय, कर चुकवून काही लोक प्रचंड प्रमाणात बेहिशोबी पैसा गोळा करतात आणि या पैशाच्या आधारावर राजकारणात प्रवेश करतात. निवडणूकीमध्ये प्रचंड प्रमाणात खर्च करुन निवडूनही येतात. त्यामुळे चारित्र्य संपन्न लोक राजकारणापासून दूर राहतात. ही बाब सदृढ लोकशाहीसाठी मारक ठरत आहे. सर्वोच्च न्यायालयात एका सुनावणी दरम्यान ॲटर्जी जनरल वेणू गोपाल म्हणाले की, निवडणूकीत काळा पैसा वापरला जातो यात तथ्य आहे. मतदारांना आकर्षित करण्यासाठी बेकायदेशीर पद्धती वापरल्या जातात.

**काळ्या पैशाच्या नियंत्रणासाठी उपाय (Remedies of Black Money)**

काळा पैसा आर्थिक विकासात प्रमुख अडथळा बनत असल्यामुळे त्यावर उपाय योजना करणे आवश्यक आहे. त्याशिवाय अपेक्षित उद्दिष्टांची पूर्तता होणे शक्य नाही. काळ्या पैशावर नियंत्रण ठेवण्यासाठी काही उपाय आहेत ते पुढील प्रमाणे-

**1. स्वेच्छा उत्पन्न प्रकट योजना**

ही योजना भारत सरकारने स्वातंत्र्यानंतर अनेक वेळा घोषित केली. स्वयंघोषित उत्पन्न व संपत्ती कायद्याप्रमाणे नागरिक आपल्या जवळील काळा पैसा व संपत्ती किती आहे हे स्वेच्छेने सरकारला कळवू शकतात व कोणत्याही प्रकारची शिक्षा किंवा दंड न भरता घोषित केलेल्या संपत्तीवर संपत्तीकर व काळ्या उत्पन्नावर उत्पन्न कर सरकारकडे जमा करु शकतात. परंतु या योजनेमुळे अपेक्षित काळ्या पैशाची रक्कम मिळाली नाही. तरी पण अशी संधी पुन्हा देणे आवश्यक आहे.

**2. विशिष्ट चलनी नोटा रद्द करणे**

केंद्र सरकारने जानेवारी 1978 मध्ये काळा पैसा नष्ट करण्यासाठी 1000, 5000, 10000 रुपयाच्या किंमतीच्या नोटा चलनातून रद्द केल्या. त्यानंतर 500 व 1000 रुपयांच्या नोटा रद्द करण्याचा मोठा निर्णय नोव्हेंबर-2016 मध्ये घेण्यात आला. अशा नोटा बदलून घेतांना त्या कशा व कोणत्या व्यवहारातून मिळाल्या याचे स्पष्टीकरण नोटाधारकांनी देणे बंधनकारक करण्यात आले. परंतु काळ्या पैशाच्या तुलनेने रद्द झालेल्या नोटांची संख्या कमी राहिली असल्याचे दिसून येते. सरकारने आता रोकड विरहित व्यवहाराला चालना दिल्यामुळे आणि लोकांचाही प्रतिसाद मिळत असल्यामुळे जास्त मूल्य असलेल्या 2000 रु. च्या नोटा चलनातून रद्द करणे आवश्यक आहे.

**3. काळ्या पैशाच्या शोधासाठी धाडी सत्राचा अवलंब करणे**

भारतात एखाद्या व्यक्तीने अवैध मार्गाने मोठ्या प्रमाणावर काळा पैसा मिळविल्याचा संशय आल्यावर अशा व्यक्तीच्या घरावर किंवा कार्यालयावर धाडी घालण्याचा कायदेशीर अधिकार उत्पन्नकर आयुक्तांना देण्यात आला आहे. त्यानुसार काळा पैसा असणाऱ्या व्यक्तीच्या घरावर धाडी टाकल्यास अशा व्यक्तीवर वचक बसून काळा पैशावर नियंत्रण मिळविता येऊ शकेल.

**4. कायद्याची कडक अंमलबजावणी करणे**

सध्या अस्तित्त्वात असलेल्या कायद्याची कठोरपणे व विनाविलंब अंमलबजावणी केल्यास कर बुडवे, बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्या लोकांवर वचक बसेल. त्यामुळे काळ्या पैशाचे प्रमाण कमी होईल.

**5. ऑनलाईन आर्थिक गुन्ह्यावर नियंत्रण**

ISBN-978-93-84593-96-4

अलिकडच्या काळात रोकडविरहित व्यवहार वाढल्यामुळे लोक नेटबँकींग, मोबाईल बँकींगचा वापर मोठ्या प्रमाणावर करु लागले आहेत. तसेच ऑनलाईन आर्थिक गुन्ह्यातही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. अशा आर्थिक गुन्ह्यातून काळ्या पैशाची निर्मिती होत आहे. त्यासाठी स्वतंत्र सक्षम यंत्रणा उभारण्यात यावी.

**6. लोकांनी प्रामाणिकपणे कर भरणे**

शासकीय, निमशासकीय कर्मचारी, व्यवसायिक करदाते, राजकीय व्यक्ती यांनी प्रामाणिकपणे सरकारला कर भरल्यास काळ्या पैशाचे प्रमाण कमी होईल. त्यासाठी लोकांनी प्रामाणिकपणे कर भरणे आवश्यक आहे.

**7. कराचे दर कमी करणे**

भारतात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कराचे दर लोकांच्या कर देयक्षमतेपेक्षा अधिक असल्याने बहुतांश करदाते कर भरण्यासाठी पळवाट शोधतात. लोकांनी कर भरणे टाळल्यास सरकारचा महसूल कमी होऊन विकासाच्या प्रक्रियेत अडथळा येतो. म्हणून वर्तमान परिस्थितीनुसार कराच्या दरात सुधारणा करणे आवश्यक आहे.

**8. ग्राहकांत जागृती निर्माण करणे**

ग्राहकांनी कोणत्याही वस्तूची खरेदी करतांना कायदेशीर कर भरणा केलेली पावती घ्यावी. जेणेकरुन बिलाची संपूर्ण रक्कम प्रत्येक दुकानदारामार्फत शासनास दाखवावी लागेल. त्यामुळे कराची रक्कम सरकारकडे जमा होईल. यासाठी ग्राहकांत जागृती निर्माण करणे गरजेचे आहे.

**9. शेती विषयक कायद्यांत सुधारणा**

भारतात शेती क्षेत्रात काळा पैसा गुंतविणारा एक नवश्रीमंत वर्ग निर्माण झाला आहे. देशातील शेतीविषयक कायद्यात सुधारणा करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. शेती खरेदी करतांना पॅन कार्डाची सक्ती, शेती खरेदी करणाऱ्यावर स्वत: शेतीकरण्याची सक्ती व पडीक जमिनीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरुन काळ्या पैशाची शेती क्षेत्रात कमी गुंतवणूक होऊन काळया पैशांच्या निर्मितीस आळा बसेल.

**निष्कर्ष (Conclusion)**

काळा पैसा भारतीय अर्थव्यवस्थेला लागलेली कीड आहे. भ्रष्टाचार, अवैध व्यवसाय यातून निर्माण होणारा काळा पैसा यामुळे देशात मोठ्या प्रमाणावर आर्थिक विषमता निर्माण झाली आहे. यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि सर्वसामान्य जनतेवर विपरीत परिणाम होत आहे. हा बेहिशेबी काळा पैसा, संपत्ती देशातील विकास कामासाठी वापरली तर देशाचा विकास होऊन सामान्य लोकांचे जीवनमान सुधारुन भारत आर्थिक महासत्ता म्हणून उदयास येईल.

**संदर्भ सूची**

1. Gaurav Datta & Ashwini Mahajan - Indian Economy - S.Chand & Company Pvt. Ltd., New Delhi-2014.
2. डॉ. ब्रिजमोहन दायमा - बदलते भारतीय शिक्षण, अर्थकारण, समाजकारण व राजकारण- विद्याभारती प्रकाशन, लातूर-2012.
3. डॉ. र.पु. कुरुलकर - भारतीय अर्थशास्त्र- विद्या प्रकाशन, नागपूर-1993.
4. White Paper on Black Money Govt. of India Report 2012.
5. अर्थसंवाद - मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक - ऑक्टोंबर/डिसेंबर-2013.
6. अर्थसंवाद - मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक - ऑक्टोंबर/डिसेंबर-2016.
7. दैनिक लोकसत्ता - दि. 30 डिसेंबर 2016.
8. दैनिक पुढारी - दि. 08 नोव्हेंबर 2017, 06 जाने. 2019.
9. www.indianblackmoney.com
10. Indianblackmoney Wikipedia